प्रेस प्रकाशनी PRESS RELEASE

भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA

संचार विभाग, केंद्रीय कार्यालय, एस.बी.एस.मार्ग, मुंबई-400001
DEPARTMENT OF COMMUNICATION, Central Office, S.B.S.Marg, Mumbai-400001
फोन/Phone: 91 22 2266 0502 फैक्स/Fax: 91 22 22660358

वेबसाइट : www.rbi.org.in/hindi
Website : www.rbi.org.in
इ-मेल email: helpdoc@rbi.org.in

सप्टेंबर 23, 2016

**इनसेट अक्षर नसलेल्या, अंक फलकांमध्ये वाढत्या आकाराचे अंक असलेल्या आणि**
**इंटालिओ छपाई नसलेल्या**
**रु.50 मूल्याच्या बँक नोटांचे वितरण**

भारतीय रिझर्व बँक लवकरच, महात्मा गांधी मालिका-2005 मधील, दोन्हीही अंक फलकांमध्ये इनसेट अक्षर नसलेल्या व रिझर्व बँकेचे गव्हर्नर डॉ. रघुराम जी राजन ह्यांची सही असलेल्या आणि नोटेच्या मागील बाजूवर '2016' हे छपाईचे वर्ष असलेल्या रु.50 मूल्याच्या बँक नोटा प्रसृत करणार आहे.

ह्या नोटांचे डिझाईन व सुरक्षा लक्षणे, पुढील गोष्टी सोडल्यास आधी दिलेल्या महात्मा गांधी मालिका-2005 मधील, दोन्हीही अंक फलकांमध्ये वाढत्या आकाराचे अंक असलेल्या रु.50 च्या बँक नोटांप्रमाणेच असतील.

***मागील बाजू***

**इंटाग्लिओ छपाई**

'50' हा अंक, आरबीआय सील, महात्मा गांधीचे चित्र, आरबीआय लीजंड, गॅरंटी व प्रॉमिज क्लॉज, गव्हर्नरांची सही, अशोक स्तंभ चिन्ह हे पूर्वी इंटाग्लिओ छपाईत (वर आलेली/उंचावलेली म्हणजे रेज्ड छपाई) केले जात असे ते आता ऑफसेट छपाईने (वर न आलेली/ न उंचावलेली छपाई) करण्यात आले आहे. ह्याशिवाय बँक नोटेच्या डावीकडे असलेले ओळख चिन्ह काढून टाकण्यात आले आहे.

**रंग**

मागील बाजूवरील रंगामध्ये कोणताही बदल केला नसला, तरी मागील बाजूवरील रंग (इंटाग्लिओ छपाई काढून टाकण्यात आली असल्याने) फिकट आहे.

**सुप्त प्रतिमा**

महात्मा गांधीच्या उजव्या बाजूस असलेल्या उभ्या पट्ट्यात, पूर्वी मूल्य दर्शविणा-या '50' ह्या अंकाची सुप्त प्रतिमा होती. ही सुप्त प्रतिमा, बँक नोट डोळ्यासमोर आडवी धरुन पाहिल्यासच दिसत असे. हे लक्षण आता काढून टाकण्यात आले आहे.

*मागील बाजू*

बँक नोटेच्या मागील बाजूमध्ये कोणताही बदल केलेला नाही.

ह्या नोटेच्या नमुन्याची प्रतिमा खाली दिली आहे.







ह्या बँकेने ह्यापूर्वी दिलेल्या रु.50 च्या बँक नोटा वैध चलन असणे सुरुच राहील.

**अजित प्रसाद**
सहाय्यक सल्लागार

**वृत्तपत्र निवेदन : 2016-2017/751**